# आतकोली क्षेपणभूमी परिसराचा पर्यावरणपूरक विकास होणार - सौरभ राव

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
वर्ष-४
अंक - ३६
epaper.diwanews.com

**ठाणे** : ठाणे महानगरपालिकेच्या आतकोली क्षेपणभूमी आणि परिसराचा पर्यावरणपूरक विकास होणार आहे. या परिसरात बांबूचे बन आणि मध्यभागी विविध ठिकाणी हरित बेटे तयार केली जाणार आहेत, अशी माहिती ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली. राज्य शासनाने ठाणे महापालिकेस भिवंडीतील मौजे आतकोली येथे शास्त्रोक्त पद्धतीने कच्र्याची विल्हेवाट लावण्यासाठी ३४ हेक्टर क्षेत्र ठाणे महापालिकेस प्रदान केले आहे.(पान ४ वर)

www.diwanews.com ♦ सोमवार,७ एप्रिल २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किंमत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669



## पाणी चोरी,अनधिकृत नळ कनेक्शन आणि पाणी समस्या

# दिवा शहरातील पाणीटंचाईवर ठोस उपाययोजना काय ?

**दिवा:**गेल्या काही दिवसांपासून महापालिका प्रशासनाने अनधिकृत नळ कनेक्शन विरोधात दिवा आणि मुंब्रा येथे कारवाईचा धडका लावला आहे. या कारवाईतून महापालिका आपलीच पाठ थोपटून घेत आहे. दिव्यासारख्या शहरात ठाणे महानगरपालिकेची पाणी वितरण व्यवस्थाच नसल्याने केवळ अनधिकृत नळ कनेक्शन तोडल्याने दिवा शहरातील पाणीटंचाई निकालात निघेल अशी स्थिती नसल्याचे शहरातील नागरिकांचे मत आहे. दिवा शहराला एमआयडीसीकडून पाणी मिळत असताना, पाणी वितरण करणारी व्यवस्था महापालिकेकडे नाही. मागील पाच दहा वर्षात मोठ्या प्रमाणात वाढलेल्या दिवा शहरात विभागनिहाय जलकुंभ नाहीत. याचा परिणाम पाणी वितरण व्यवस्थेवर होतो. शहरातील अनेक रहिवाशी इमारतीने महापालिकेच्या अधिकृत नळ जोडण्या घेतलेल्या आहेत.मात्र या नळ जोडण्यांना पाणी नसल्याच्या तक्रारी वारंवार नागरिकाकडून होत असतात. एकीकडे महानगरपालिकेकडून घेतलेल्या नळ कनेक्शन ना पाणी नाही आणि दुसरीकडे अनधिकृत नळ कनेक्शन देण्य्रया पाणीमाफियांकडून मिळण्य्रया पाईपलाईन ना असणारे पाणी अशी परस्पर विरोधी स्थिती दिवा शहरात आहे. दिव्यातील नागरिकांना मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेकडे ठोस उपाय योजना नाही.महापालिकेने वितरण व्यवस्था सुधारून प्रत्येक इमारतीपर्यंत महापालिकेच्या नळ कनेक्शन द्वारे पाणीपुरवठा करायला हवा असं मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिवा अध्यक्ष तुषार पाटील यांनी या विषयावर बोलताना व्यक्त केले आहे. महापालिकेच्या नळ कनेक्शनला पाणी नाही. मात्र चोरट्या मार्गे घेतलेल्या नळ कनेक्शनला पाणी आहे. दिवा शहरातील नागरिकांना चोरट्या मार्गाने पाणीपुरवठा करण्य्रया कनेक्शन वर महापालिकेने कारवाई केली तरीही मुळात महापालिकेच्या नळ कलेक्शनला पाणी नसल्याने येण्य्रया काळात पुन्हा अनधिकृत नळ कनेक्शन वाढतील अशी भीतीही तुषार पाटील यांनी या विषयावर बोलताना व्यक्त केली.एकंदरीत महापालिका प्रशासनाकडे पाणी वितरण व्यवस्थेबाबत ठोस प्लॅन नसल्याने दिवा शहरात गंभीर स्वरूपाची पाणीटंचाई असून महापालिकेच्या भूमिकेमुळे गेली अनेक वर्ष नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. केवळ अनधिकृत नळ कनेक्शन वर कारवाई करून दिवावासीयांना प्रशासनाकडून पाणी मिळणार आहे का ? हा प्रश्न या निमित्ताने निर्माण होत आहे.याचे कारण ही तसेच आहे. कारण दिवा शहरात बेतवडे येथे दोन जलकुंभ बंद स्थितीत आहेत.यातच महापालिका अधिक्र्यांच्या आशीर्वादाने पाणी माफियांचे दिवा शहरात जाळे पसरले असल्याचा आरोप शहरातील जाणकार नागरीक करतात.

दिवा शहरात कृत्रिम पाणी टंचाईची समस्या गेल्या एक ते दोन वर्षांमध्ये निर्माण झालेली नाही. तर गेल्या अनेक वर्षांपासून सुरूच आहे.दिव्यात वाढत्या नागरीकरणामुळे ती समस्या आता तीव्र झाली आहे. अनधिकृत नळ कनेक्शन वर कायमस्वरूपी कारवाई करून अधिकृत नळ कनेक्शन मधून नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा होणार का ?असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.



दिवा न्यूज विशेष

## पाणी चोरी करणाऱ्यांवर होणाऱ्या कारवाईत सातत्य का नाही? पालिकेने नागरिकांना मुबलक पाणी दिल्यास पाणी चोरांची दुकाने बंद होतील - तुषार पाटील

दिवा आणि मुंब्रा या परिसरात अनधिकृत नळ कनेक्शन विरोधात महापालिका प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे. यामध्ये व्यावसायिक आणि घरगुती अनधिकृत नळ जोडण्या खंडीत करण्यात आल्या आहेत. तसेच मोटर व पंप जप्त आणि अनधिकृत टँकर भरणा केंद्र बंद केले. याशिवाय पोलीस ठाण्यात गुन्हे ही दाखल केले आहेत.पालिकेने कारवाईत सातत्य दाखविल्यास या कारवाईचे स्वागत करायला हवे.

ही कारवाई अशी सुरूच राहणार आहे.दुसरीकडे महापालिकेने ही नळ कनेक्शन खंडीत करण्यात धन्यता न मानता आपली वितरण व्यवस्था देखील अधिक सक्षम आणि मजबूत करायला हवी. महापालिका प्रशासनाने दिवा शहरात उभारलेले जलकुंभ सुरू करून वितरण व्यवस्थेवर लक्षकेंद्रित केले पाहिजे.तसेच काही अधिक्र्यांमुळे फोफावलेली पाणी चोरी याला वेळीच आवर घातला पाहिजे. दिव्यातही स्मार्ट मीटर लावून पाण्याचे मोजमाप करावे. जर महापालिका प्रशासनाकडून घेतलेल्या नळ जोडण्यांना पाणी मिळत असेल तर पाण्याचे पैसे भरण्यात दिवा वासीयांना कोणती अडचण असेल ? अधिकृत नळ जोडण्यांना पाणीच येत नसताना लाखो रुपयांचे बील आम्ही का भरायचं असा सवाल ही दिवेकर नागरिक उपस्थित करतात.अनेकजण गरजे पुरते पाणी मिळावे, म्हणून पाणी माफियांकडून नळ जोडण्या घेऊन त्यांना दरमहा ६ ते १० हजार रुपये जास्तीतचे मोजत असल्याची चर्चा दिव्यात असते. महापालिका प्रशासनाची वितरण व्यवस्था सक्षम आणि मजबूत असेल तर दिव्यात निर्माण झालेली कृत्रिम पाणी टंचाई कायम दूर होईल आणि पाण्यासाठी होणारी आंदोलने ही होणार नाहीत.पालिका प्रशासनाला दिव्यातील पाणी टंचाई बरोबर पसरलेले पाणी माफियांचे जाळे कायम नष्ट करण्यासाठी कारवाई अधिक तीव्र करावी लागेल. सदर कारवाईत सातत्य ठेवावे लागेल. वितरण व्यवस्थेवर लक्षकेंद्रित केल्याशिवाय पाणी प्रश्न सुटणार नाही.ठजलकुंभ बांधा आणि पाणी पुरवठा करा अशी मागणी सुजाण दिवेकर नागरिकांची आहे.मुळात ज्यांचे कनेक्शन तोडतात त्यांना लगेच पालिके मार्फत पाणी पुरवले गेले तरच चोरी थांबेल आणि पालिकेचे उत्पन्न ही वाढेल असेही तुषार पाटील शेवटी सांगतात.

# इंग्रजी माध्यम शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मराठीत बोलण्यास बंदी, पालकांमध्ये नाराजी

## ठाणे जिल्ह्यातील इंग्रजी माध्यम शाळांमधील मराठी भाषेवरील बंधनाबाबत मनविसेची तक्रार

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील काही इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मराठीत बोलण्यास मनाई केली जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. आयसीएसई आणि सीबीएसई शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ इंग्रजीतच संवाद साधण्याची सक्ती केली जात असून, मराठीत बोलण्यास मनाई केली जात असल्याच्या तक्रारी पालकांनी मनसेकडे केली आहे. याप्रकरणी शिक्षण विभागाने सर्व शाळांची तपासणी करून त्यावर कारवाई करावी, अशी मागणी मनविसेचे सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्र राज्यात मराठी ही अधिकृत भाषा असून, राज्य सरकारने शासन निर्णयानुसार सर्व शाळांमध्ये मराठी भाषेला योग्य स्थान देण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, काही इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये या निर्णयाचे उल्लंघन होत असल्याचे दिसत आहे. या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा बोलण्याची सक्ती केली जात आहे.

*शिक्षण विभागाने या तक्रारीची गांभीर्याने दखल घेतल्यास मराठी भाषेचा सन्मान राखला जाईल आणि विद्यार्थ्यांना आपल्या मातृभाषेत संवाद साधण्याचा स्वाभिमान टिकून राहील. काही शाळा राज्यगीत देखील लावत नाहीत. याप्रकरणी शिक्षण विभागाने सर्व शाळांची तपासणी करून अशा शाळांवर कारवाई करावी.*

**-संदीप पाचंगे,सरचिटणीस, मनविसे.**

विद्यार्थ्यांनी वर्गात, शाळेच्या आवारात किंवा इतरत्र मराठीत संवाद साधण्यास शिक्षण संस्थेतर्फे मनाई केली जात असल्याची तक्रार पालकांनी केली आहे. विशेषतः गणित, विज्ञान, इतिहास यांसारख्या विषयांचे अध्यापन इंग्रजीतूनच आहे त्यामुळे इंग्रजी बोलण्यात मुले पारंगत झाली आहेत मात्र मराठी भाषेत संभाषण करू शकत नाहीत हा दुष्परिणाम होतो आहे असे सांगण्यात आले आहे. अशा पद्धतीने विद्यार्थ्यांवर भाषिक बंधने लादल्याने त्यांच्यातील मराठी भाषेचा आत्मविश्वास कमी होत आहे. महाराष्ट्र राज्यात मराठी ही प्रमुख भाषा असूनही काही शाळा इंग्रजीच्या प्राधान्यामुळे मातृभाषेची गळचेपी करत असल्याचा आरोप पाचंगे यांनी केला आहे.

इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना लहानपणा पासूनच मराठी बोलायची गरज नाही असे शिकवले गेल्यामुळे भविष्यात या मुलांना मराठी भाषे विषयी पर्यायाने महाराष्ट्रा विषयी आत्मीयता उरणार नाही. महाराष्ट्रात शिकणाऱ्या मुलांना लहान वयातच राजभाषे विषयी आदराची भावना निर्माण करणे गरजेचे आहे. मराठी फक्त परीक्षेत मिळणाऱ्या गुणांसाठीची भाषा असा समज निर्माण होतोय. महाराष्ट्राची थोर संत परंपरा, जाज्वल्य इतिहास, शौर्यगाथा याविषयी आवड निर्माण होण्याकरिता संभाषण मराठीतूनच झाले पाहिजे, अशी मागणी मनसेकडून करण्यात आली आहे. मनविसेच्या शिष्टमंडळात शहर अध्यक्ष निलेश वैती, सचिन सरोदे, प्रमोद पत्ताडे, अमित मोरे, राकेश आंग्रे, हेमंत मोरे, सागर वर्तक तसेच इतर कार्यकर्त्यांचा समावेश होता.

# ठाणे महापालिकेच्या मलनि:सारण विभागात बनावट दस्तावेज घोटाळा उघड !

## बनावट दस्तावेज सादर करून घेतले जात आहेत कोट्यवधींची कामे

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या मलनि:सारण विभागात मोठ्या प्रमाणावर बनावट दस्तावेज घोटाळा सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे स्वप्नील महिंद्रकर यांनी १७५ कोटींच्या नाले बांधकामाच्या निविदांमध्ये घोटाळा झाला असून या गैरव्यवहाराचा पर्दाफाश केला आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांना हा प्रकार माहीत असूनही त्यांनी कोणतीही कारवाई केली नसल्याचे समोर आले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात मूलभूत सुविधांच्या विकास योजनेअंतर्गत ठाणे महानगरपालिकेने सुमारे १७५ कोटी रुपयांच्या नाले बांधकामासाठी निविदा काढल्या होत्या. शासनाच्या निधीतून होणाऱ्या या कामांसाठी निविदा प्रक्रिया राबवून ठेकेदारांची नियुक्ती करण्यात आली. मात्र, निविदा प्रक्रियेत पारदर्शकता न राखता ठेकेदारांनी बनावट दस्तावेज सादर करून महापालिकेची मोठ्या प्रमाणावर फसवणूक केली आहे. यामध्ये महापालिकेच्या माजीवाडा-मानपाडा, वर्तक नगर, वागळे, कळवा, दिवा आणि मुंब्रा भागांमध्ये नाले बांधकामासाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. या प्रक्रियेत सहभाग घेतलेल्या फोर्स कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराने बनावट कागदपत्रे सादर केली आहेत. विशेष म्हणजे, महापालिकेच्या अधिकाऱ्यांना याची कल्पना असूनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. उलट या ठेकेदाराला इतर मोठी कामे मिळवून देण्यात आली असल्याचा आरोप महिंद्रकर यांनी केला आहे.

दरम्यान गेल्या पाच वर्षांपासून हा ठेकेदार ठाणे महानगरपालिकेत बनावट कागदपत्रांच्या आधारे करोडो रुपयांची कामे मिळवत आहे. इतर ठेकेदारांशी संगनमत करून महापालिकेची फसवणूक करण्याचे प्रकार सुरु असून, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदाराच्या कागदपत्रांची योग्य पडताळणी न केल्यामुळे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे.

### ठेकेदारावर कारवाईची मागणी

या गैरप्रकरणाची गंभीर दखल घेत मनसेने या ठेकेदारासह त्याला मदत करणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. तसेच, संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून त्याने गेल्या दहा वर्षांत महापालिकेत केलेल्या सर्व कामांची चौकशी करण्यात यावी., अशी मागणी मनसेने महापालिका आयुक्तांकडे केली आहे. - स्वप्नील महिंद्रकर, ठाणे शहर अध्यक्ष, जनहित व विधी विभाग, मनसे

### बनावट दस्तावेज कुठून बनले?

विशेष म्हणजे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांच्या कार्यालयातून हे बनावट दस्तावेज तयार करून घेतल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या संपूर्ण घोटाळ्यामागे मोठ्या अधिकाऱ्यांचा हात असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.



ठाणे: दिवा, दातिवली स्मशानभूमी जवळील सिताराम नगर येथील तळ अधिक ०४ मजली लक्ष्मी निवास या रिकाम्या इमारतीच्या छतावरील लोखंडी पत्र्याची शेड तुटून लटकत होती.ही घटना शुक्रवारी दुपारी साडेचार ते पावणे पाच वाजण्याच्या सुमारास समोर आली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत, लटकत असलेली पत्र्याची लोखंडी शेड बाजूला केली असून घटनास्थळाचा धोका दूर केला आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

# रिक्षा चोरटा गजाआड ; तीन रिक्षा जप्त

**ठाणे:** ठाणे आणि उल्हासनगर या परिसरात रिक्षांची चोरी करणाऱ्या उदय विलास साठे (३२) याला ठाणे शहर पोलिसांनी अटक केली. त्याने नौपाडा, राबोडी आणि उल्हासनगर या पोलीस ठाण्यातील गुन्ह्यांची कबुली देत, त्या गुन्ह्यांमधील ०३ रिक्षा जप्त करण्यात यश आले आहे. ३१ मार्च रोजी ठाणे गुन्हे शाखेने तीन हात नाका येथून निघालेल्या उदय साठे याला संशयित म्हणून गोकुळ नगर येथे ताब्यात घेतले. त्याची चौकशी त्याने वरील गुन्ह्यांची कबुली दिली असून त्याच्याकडून १ लाख ३० हजार रुपये किंमतीच्या तीन रिक्षा जप्त केल्याची माहिती पोलिसांनी दिली. पुढील तपास ठाणे गुन्हे शाखा १ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.




हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

## गहाळ झालेला आयफोन तरुणीला केला परत



**ठाणे:** रिक्षा प्रवासात वर्तकनगर येथील पूनम चौधरी (२५) या तरुणीचा आयफोन १५ मोबाईल गहाळ झाला होता. तो फोन वर्तकनगर पोलिसांनी अवघ्या आठवड्यात परत केला असून त्या मोबाईल फोनची किंमत १ लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

वर्तकनगर, दोस्ती विहार येथे राहणाऱ्या चौधरी (२५) या ३० मार्च २०२५ रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास रिक्षाने प्रवास करत होत्या. त्या वर्तकनगर नाका ते राहते घर असा रिक्षाने प्रवास करीत असताना त्या रिक्षामध्ये त्यांचा १ लाख रुपये किंमतीचा आयफोन १५ मोबाईल फोन गहाळ झाल्याची तक्रार त्यांनी वर्तक नगर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली होती. ती माहिती मिळताच तात्काळ वर्तक नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमार वाघचवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल चिंतामण व पोलीस शिपाई नानासाहेब विठ्ठल नागरे यांनी त्या मोबाईलचा तांत्रिक विश्लेषणाद्वारे कौशल्यपूर्ण तपास करून गहाळ झालेला तो मोबाईल फोन हस्तगत करून फिर्यादीला परत केला अशी माहिती पोलिसांनी दिली.

## गहाळ झालेले १०२ मोबाइल केले पोलिसांनी परत



**ठाणे :** कळवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मागील दोन वर्षात विविध कंपनीचे मोबाइल हरविले होते. त्यानुसार या संदर्भात कळवा पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार कळवा पोलिसांनी तपास करुन १०२ मोबाइल फोनचा शोध घेऊन १० लाख ६६ हजार रुपये किंमतीचे मोबाइल फोन तक्रारदारांना परत केले आहेत.

कळवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध प्रकारचे मोबाइल फोन हरविल्याच्या तक्रारी येत होत्या. त्या अनुषंगाने कळवा पोलीस ठाण्याच्या वरीष्ठ पोलीस निरिक्षक अशोक उतेकर यांनी पोलीस निरिक्षक (गुन्हे) अनिल गायकवाड, विठ्ठल नावडे, तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरिक्षक संतोष पिंपळे व पोलीस स्टाफ यांना प्रॉपर्टी मिसिंगची प्रकरणे उघडकीस आणण्यासाठी काही सुचना करण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस कॉन्स्टेबल प्रशांत लवटे यांनी सीईआयआर ॲपमध्ये त्या मोबाइल फोनची माहिती भरुन तांत्रिक पध्दतीने या मोबाइल फोनचा तपास सुरु केला. त्यानुसार हरलविलेल्या मोबाइल फोनचे पत्ता अंत्यत कौशल्याने प्राप्त करुन त्या पत्याबाबतची शहनिशा करुन पत्यावर समक्ष जाऊन संबधींत विविध प्रॉपर्टी मिसिंगमधील मोबाइल धारकाचे विविध कंपनीचे एकूण १०२ मोबाइल फोनचा शोध घेऊन १० लाख ६६ हजार रुपये किंमतीचे मोबाइल फोन हस्तगत केले.

## दिवा विभागातील अनधिकृत शाळा बंद करण्यासंदर्भात पथक स्थापन केल्याबद्दल शिक्षणाधिर्‍यांचे आभार.

**दिवा:**-इंडिपेंडेंट स्कूल मॅनेजमेंट असोसिएशनङ च्या वतीने आज ठाणे महानगरपालिक शिक्षण अधिकारी श्री.म्हेत्रे सर यांचे भेट घेऊन आभार व्यक्त करण्यात आले.

संघटनेतर्फे अनेक वर्षापासून दिव्यातील अनधिकृत शाळांवर कारवाई करावी यासाठी ठाणे महानगरपालिका यांच्याकडे साखड मांडण्यात येत होते परंतु सदर शाळांवर कोणतीही कारवाई न होता या शाळांची संख्या झपाट्याने वाढत गेली.माननीय शिक्षणाधिकारी श्री.म्हेत्रे सर मात्र यावर्षी अनधिकृत शाळा बंद करण्यासाठी एक स्वतंत्र पथक स्थापन केले असून सदर शाळांवर लवकरात लवकर कारवाई करण्याचे आश्वासन संघटनेला दिले आहेत. याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष श्री साईनाथ म्हात्रे सर संघटनेचे पदाधिकारी श्री.उत्तम सावंत, श्री. स्वप्निल गायकवाड, श्री. सुरेंद्र यादव सर, श्री. आदित्य पाटील सर व एड. पाल सर उपस्थित होते .

## धडाकेबाज युवा प्रतिष्ठान दिवा शहर यांच्या वतीने दिवा शहरात राम नवमी निमित्त भव्य शोभायात्रा संपन्न

श्रीराम नवमी निमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी धडाकेबाज युवा प्रतिष्ठान दिवा शहर यांच्या वतीने दिवा शहरात शोभायात्रा काढण्यात आली.या भव्य शोभा यात्रेत प्रभू श्री रामचंद्र,सीतामाता,लक्ष्मण आणि हनुमानजी यांची वेशभूषा परिधान केलेली लहान मुले प्रमुख आकर्षण ठरली...





श्रीराम नवमी निमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी धडाकेबाज युवा प्रतिष्ठान दिवा शहर यांच्या वतीने दिवा शहरात शोभायात्रा काढण्यात आली. शोभा यात्रा मध्ये प्रमुख आकर्षण हे प्रभू श्री रामचंद्र, सीतामाता ,लक्ष्मण आणि हनुमानजी यांचे रूप घेतलेले लहान मुले ठरले. सदर शोभा यात्रा महादेव मंदिर,श्लोक नगर येथून श्री रामाची आरती करून सुरुवात करत मुंब्रा देवी कॉलनी,दिवा स्टेशन रोड,दिवा आगासन रोड,ग्लोबल स्कूल मार्गे सदाशिव दळवी नगर पर्यंत काढण्यात आली. संपूर्ण दिवा शहर मध्ये जय जय श्रीराम नारा आणि भगवे ध्वज फडकवत भक्त शोभा यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.सदर यात्रेत धडाकेबाज युवा प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष श्री अमोल धनराज केंद्रे,उपाध्यक्ष रामपाल मौर्या,कार्याध्यक्ष अभयलाल दुबे,सचिव सौ अश्विनी अमोल केंद्रे, उप सचिव राजू प्रसाद गुप्ता,पिंटू यादव,नितीन आवाडे, विनोद गिरी ,मनोज गिरी,अनिल मौर्या,कमल गुप्ता,राजेश मौर्या,विद्या जैस्वाल ,कविता बामणे,गीता पाणीग्रही,राधिका गुप्ता ,माधुरी शर्मा, प्रदीप गुप्ता,कोंडीबा केंद्रे,महेंद्र घडशी, विनोद कदम,कृष्णा जाधव,रणजीत मौर्य,जीतू प्रजापति,सोनू बैद,अंगेश चौधरी,बाबू मोरे,आशिष पांडे,शंकर कांबळे,पंचम गुप्ता, कुशाल पांडे,आदित्य भारती,आशुतोष पाडी,विकास सिंग,चिराग भारद्वाज,संदीप भारद्वाज, हरिओम यादव,राजू खरात तसेच श्री राम भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.धडाकेबाज युवा प्रतिष्ठान अध्यक्ष श्री अमोल धनराज केंद्रे यांनी पोलिस प्रशासनाचे तसेच सहभागी झालेल्या श्री राम भक्तांचे मनपूर्वक आभार मानले.

# आतकोली क्षेपणभूमी परिसराचा पर्यावरणपूरक विकास होणार - सौरभ राव

**ठाणे** : ठाणे महानगरपालिकेच्या आतकोली क्षेपणभूमी आणि परिसराचा पर्यावरणपूरक विकास होणार आहे. या परिसरात बांबूचे बन आणि मध्यभागी विविध ठिकाणी हरित बेटे तयार केली जाणार आहेत, अशी माहिती ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली.

राज्य शासनाने ठाणे महापालिकेस भिवंडीतील मौजे आतकोली येथे शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी ३४ हेक्टर क्षेत्र ठाणे महापालिकेस प्रदान केले आहे. या जागेवर ठाणे महापालिकेतर्फे घनकचऱ्याचे व्यवस्थापन केले जात आहे. या जागेवर गौण खनिजाचे उत्खनन झालेले असून आता या जागेचा विकास महापालिकेमार्फत होत आहे.

**राज्य शासनाने दिला ५० कोटींचा निधी**

आतकोली येथील क्षेपणभूमीतील पायाभूत सुविधांचा विकास, संरक्षक भिंत, सुरक्षा कक्ष, पोहोच रस्ता, २२ एकरचे सपाटीकरण, बांबूचे वन आदी कामांसाठी राज्य शासनाने ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. हे काम महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहे. पूर्ण भूखंडाला चार किंमीची संरक्षक भिंत, त्याला लागून अडीच मीटर अंतराचे बांबूचे बन, कचरा वर्गीकरण प्रकल्पासाठी १२ एकर आणि ग्रॅस निर्मितीसाठी १० एकर अशा एकूण २२ एकर जागेचे सपाटीकरण करण्यात येणार आहे. त्याचसोबत, साईट कार्यालय, सुरक्षा कक्ष, शौचालय, २५० मीटरची मलवाहिनी, १५० किमींचा पोहोच रस्ता आणि त्यालगत गटार ही कामे करण्यात येणार आहेत.



या कामांच्या दृष्टीने क्षेपणभूमीची पाहणी बुधवारी महापालिका आयुक्त राव यांनी केली. तसेच, ही सर्व कामे निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावीत, असे निर्देश दिले. या पाहणीदरम्यान, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड आणि शुभांगी केसवानी, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, कार्यकारी अभियंता भगवान शिंदे आदी उपस्थित होते.

**कामे निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावीत**

आतकोली क्षेपणभूमीची संरक्षण भिंत, बांबूच्या वनाची निर्मिती, सपाटीकरण आदी पायाभूत सुविधांची कामे निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्त राव यांनी महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले. तसेच, क्षेपणभूमीलगतच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना कचऱ्याची दुर्गंधी तसेच कचरा वाहतूक यांचा त्रास होणार नाही, याची काटेकोर दक्षता घेण्याचे निर्देश घनकचरा व्यवस्थापन विभागाला दिले. या प्रकल्पासाठी वीज पुरवठा करण्यासाठी आवश्यक वीज वाहिनीचे कामही जलद करावे, अशा सूचना आयुक्त राव यांनी दिल्या. या क्षेपणभूमीच्या पूर्ण परिघावर बांबूचे बन तयार करण्यात येणार आहे. त्याच जोडीला या पावसाळ्यात क्षेपणाभूमीत ठिकठिकाणी हरित बेटे तयार करावीत. त्याचा योग्य अभ्यास करून कार्यवाही करावी, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले. तसेच, प्रवेशद्वार, स्थानिक कार्यालय या परिसरातही हरित पट्टा तयार करावा. येथील कचऱ्याचे पूर्ण गांभीर्याने व्यवस्थापन केले जात आहे, हे जाणवले पाहिजे. त्यामुळेच, कचरा टाकला की त्यावर मातीचा थर द्यावा. दुर्गंधीनाशक आणि जंतूनाशक रसायनाची प्रभावीपणे फवारणी करावी. तसेच, कचरा आणि मातीचा विशिष्ट थर तयार झाल्यावर तेथे वृक्षारोपण करावे. या सर्व गोष्टी कटाक्षाने कराव्यात, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

# ठाणे सिव्हील रुग्णालयात ज्येष्ठ नागरिकाच्या जिभेच्या कर्करोगावर यशस्वी कमांडो शस्त्रक्रिया

**ठाणे** : तंबाखू सेवनामुळे मौखिक कर्करोगाचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढतो, तरीही अनेकजण गुटखा, तंबाखू आणि सिगारेटच्या आहारी जातात. कर्करोग झाल्यानंतर त्याचा परिणाम गंभीर स्वरूपाचा होतो आणि उपचारांचा खर्चही मोठा असतो. मात्र, सर्वसामान्य रुग्णांसाठी आधारवड ठरणाऱ्या ठाणे सिव्हील रुग्णालयात तंबाखू सेवनामुळे झालेल्या मौखिक कर्करोगावर एका ज्येष्ठ नागरिकाची जोखमीची कमांडो शस्त्रक्रिया (ण्ध्र्ड्ढ-ॠ ध्र्ज्ञ्‌दह) यशस्वीपणे पार पडली आहे.



ठाण्यात रहाणारे शांताराम जाधव ७० (नाव बदलून) यांना गेल्या अनेक वर्षांपासून तंबाखू खाण्याची सवय होती. मात्र या तंबाखूने आपल्याला मौखिक कर्करोगाला सामोरे जावे लागेल याची पुसटशी कल्पना ही नव्हती. अचानक तोंडातली जीभ जाड झाल्याने बोलताना जेवताना त्रास जाणवू लागला. होणाऱ्या त्रासामुळे शांताराम हे उपचारा निमित्त ठाणे सिव्हील रुग्णालयात आले होते. यावेळी जिभेची बायप्सी केली असता, तिच्या जीभेचा कर्करोग झाल्याचे निदान झाल्यावर जिभेची शस्त्रक्रिया करण्याचे ठरले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली शांताराम यांच्या जिभेवरील कर्करोगाची शस्त्रक्रिया करण्यात आली. प्रथम शांताराम याची सर्व रक्त चाचणी झाल्यावर, शारीरिक स्वास्थ्य याची तज्ज्ञ डॉक्टर कडून तपासणी केली गेली. यावेळी शांताराम यांचा कर्करोग जिभेपासून मानेपर्यंत पसरला होता. त्यामुळे काहीशी जोखमीची शस्त्रक्रिया करण्यासाठी ऑनको सर्जन डॉ हितेश सिंगवी यांच्या मदतीने ही शस्त्राक्रिया पार पडली आहे. ही शस्त्रक्रिया दंत शल्य चिकित्सक डॉ. अर्चना पवार, भूल तज्ज्ञ डॉ. प्रियांका महांगडे, डॉ. सुजाता पाडेकर आदींनी यशस्वी केली.

गेल्या वर्षभरात ठाणे सिव्हील रुग्णालयात ही पाचवी यशस्वी कमांडो शस्त्रक्रिया पार पडली आहे.सिव्हील रुग्णालयातील दंत विभागात येणाऱ्या प्रत्येक रुग्णांना मौखिक कर्करोगाविषयी मार्गदर्शन केले जाते.

**- डॉ. अर्चना पवार**
**(दंतशल्य चिकीत्सक)**

आमच्या प्रयत्नांचा उद्देश रुग्णांना दर्जेदार उपचार सिव्हील रुग्णालयातच उपलब्ध करून देणे हा आहे. खाजगी रुग्णालयांमध्ये कर्करोग उपचारांचे मोठे आर्थिक ओझे सर्वसामान्यांना झेलता येत नाही. त्यामुळे अनेक रुग्णांना मुंबईतील टाटा रुग्णालयात धाव घ्यावी लागते. मात्र, ठाणे सिव्हील रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली मौखिक कर्करोगाच्या शस्त्रक्रिया केल्या जात असून रुग्णांना दिलासा मिळत आहे.

**- डॉ. कैलास पवार**
**(जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे )**

# मुंब्रा- कौसा भागात काळाबाजार आणि राजकारण केले जातेय - जितेंद्र आव्हाडांचा आरोप

## कृत्रिम पाणी टंचाईला टँकर माफीया आणि पालिका अधिकारी जबाबदार

**ठाणे:** एकीकडे ठाणे महानगरपालिकेकडून मुंब्रा, कौसा, खर्डी भागात अपुरा पाणीपुरवठा केला जात आहे. तर दुसरीकडे याच मुंब्रा - कौसा भागात बांधकामांना अनधिकृतरीत्या पाणी पुरवठा होत असल्याचा आरोप शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार डॉ जितेंद्र आव्हाड यांनी केला. त्यामुळेच या परिसरात पाण्याचा ठकाळाबाजारठ आणि राजकारण केले जात आहे. असे ही ते म्हणाले। तसेच या भागात मीटरद्वारे पाण्याचे मोजमाप केले जावे अशी मागणी केली आहे. परंतु अधिकारी मात्र मीटर लावण्यास तयार नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. केवळ कृत्रिम पाणी टंचाई दाखवून पाणी माफीया आणि टँकर माफीया यांच्यासाठी रचलेले हा डाव असल्याचेही त्यांनी उघड केले आहे. यासंदर्भात आव्हाडांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

मुंब्रा-कौसा भागात गेल्या अनेक दिवसांपासून कृत्रिम पाणी टंचाई निर्माण केली जात आहे.असे निवेदनात नमूद करताना, विविध प्राधिकरणांकडून अपुरा पाणी पुरवठा केला जात असल्याचे कारण पुढे करून ठाणे महानगर पालिकेकडून मुंब्रा, कौसा, खर्डी भागात अपुरा पाणीपुरवठा केला जात आहे. अनेकवेळा सांगूनही होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे मोजमाप करण्यासाठी मीटरही लावण्यात येत नाहीत. या भागात केल्या जाणाऱ्या पाण्याचे मोजमाप करण्यास अधिकारी तयार का होत नाहीत ? आपण सांगितल्यानंतर देखील या मोजमाप प्रक्रियेला वेळ लागेल, असे आपले अधिकारी सांगत आहेत. जर एका दिवसात एका भागातील ५० अनधिकृत नळजोडण्या, अनधिकृत पाण्याच्या टाक्या शोधल्या जात असतील तर हे मोजमाप करण्यास टाळाटाळ का केली जात आहे ? अधिकारी वर्गाला हाताशी धरून पाणी माफिया, टँकर माफिया यांनी पैशांसाठी रचलेला हा डाव आहे. ही कृत्रिम पाणी टंचाई मी आपल्या निदर्शनास आणून दिली, असेही म्हटले आहे. तसेच याबाबत अनेकवेळा बैठका घेतल्या, विधानसभेत प्रश्न देखील विचारले. पण, हे प्रकरण गांभीर्याने घेताना आणि आस्थेने कारवाई करताना पालिका प्रशासन दिसत नाही. त्यामुळेच या परिसरात पाण्याचा ठकाळाबाजारठ आणि राजकारण केले जात आहे. असेही त्यांनी नमूद केले आहे.

पाणी माफियांवर पाण्याच्या चोरीबाबत गांभीर्याने गुन्हे दाखल झाले पाहिजेत ही मागणी अनेकवेळा करूनही साधा गुन्हा दाखल करण्याचे धारिष्ट्य प्रशासनाकडून दाखविले जात नाही. आणि चुकून याबाबत एखादा गुन्हा दाखल झाला तर त्यात एकालाही अटक होत नाही.असेही म्हटले आहे. मग तो गुन्हा नोंदवता तरी कशाला ? एकीकडे इतक्या मोठ्या प्रमाणावर पाणी चोरी होत असताना दुसरीकडे अधिकारी मात्र त्यांच्या मर्जीनुसार बिनधास्त वागत आहेत. कारण, त्यांना कोणाचीही कशाचीही भीतीच् राहिलेली नाही. पाणीचोरी पकडल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार याबाबत अद्याप कोणतीही स्पष्टता झालेली नाही. त्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाला संपूर्णतः ठाणे महानगर पालिका प्रशासन जबाबदार आहे. ही पाणीचोरी उघडपणे होत आहे आणि आपले संबधित विभागाचे अधिकारी या पाणीचोरांना सर्वोतोपरी सहकार्य करण्याची भूमिका घेत असल्याने या प्रकरणात दोन्ही कार्यकारी अभियंत्यांवर निलंबनाची कारवाई होणे अत्यंत गरजेचे आहे. या कारवाईशिवाय आपणही या पाणीचोरीकडे, गांभीर्याने पाहत नाही, असा समज जनसामान्यात निर्माण होऊ शकतो. याची आठवण आयुक्तांना निवेदन पत्रात करून दिली आहे.

मुंब्रा-कौसा भागात राजरोसपणे अनधिकृत बांधकामे होत असुन या बांधकामांना अनधिकृतरीत्या पाणी उपलब्ध करून दिले जात आहे. अनधिकृत बांधकामांना पाणी देण्यासाठी एखाद्या परिसरातील पाणीपुरवठ्यात कपात केली जाते. मी गेली अनेक वर्षे या परिसरातील लोकांचे प्रतिनिधीत्व करीत आहे. यापूर्वी अशा पद्धतीने पाणीचोरी कधीही होत नव्हती. परंतु आता मात्र या परिसरातील पाणीचोरी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. या परिसरात कायद्याचे राज्य आहे कुठे ? असा सवाल उपस्थित होत आहे. अनधिकृत नळजोडण्या देण्याबरोबरच २०-२० हजार लिटर्स पाण्याच्या टाक्या बेमालूमपणे उभ्या केल्या जात असतील तर ठाणे महानगर पालिका प्रशासन कुचकामी ठरत असल्याचे स्पष्ट होत आहे. या संपूर्ण प्रकाराला आळा घालण्यासाठी पाणी माफिया आणि संबधित अधिकारी यांच्याविरुद्ध तातडीने कायदेशीर कारवाई करणे अत्यंत गरजेचे असुन या संपूर्ण प्रकरणात आपण गांभीर्याने लक्ष घालावे असेही शेवटी आव्हाडांनी म्हटले आहे.

# शुक्रवारी अचानक वादळी वारा ; ठाण्यात पडली उन्मळून ३ झाडे ,एका घटनेत तीन दुचाकींचे नुकसान

**ठाणे :** हवामान खात्याने राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तविला असताना गुरुवारीप्रमाणे शुक्रवारीही सकाळपासून ढगाळ वातावरण होते. त्यातच अचानक दुपारी चार वाजण्याच्या नंतर वातावरण बदल होऊन जोराचा वादळी वारा सुरू झाला. याचदरम्यान शहरात धुळीचे साम्राज्य पसरलेच याशिवाय शहरातील नौपाडा, मानपाडा आणि पवारनगर या ०३ ठिकाणी झाडे आणि वागळे इस्टेट परिसरात एका ठिकाणी झाडांच्या फांदी तुटून पडली. सुदैवाने या घटनांमध्ये कोणालाही दुखापत झालेली नसून एका झाड पडल्याचा घटनेत तीन दुचाकींचे नुकसान झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. दरम्यान जुन्या कळवा खाडी पुलावर विद्युत लाईटचा पोल ही मधोमध तुटून पडला आहे. याशिवाय ठाणे स्टेशन परिसरातील दिशादर्शक फलकही धोकादायक झाला होता.

बंगालच्या उपसागरावरून येणारे बाष्पयुक्त वारे आणि ओडिशापासून तमिळनाडूपर्यंत हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाल्यामुळे पुढील पाच दिवस राज्यात ढगाळ वातावरण असणार असून यामुळे वादळी वारे, ढगांच्या गडगडाटासह अवकाळी पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. अशातच शुक्रवारी ठाणे शहरातील वातावरणात अचानक बदल घडून ढगाळ वातावरण झाले होते. त्यातच गुरुवारी आणि शुक्रवारी सकाळपासूनच ढगाळ वातवरण निर्माण झाले होते, अशातच सायंकाळी ४.०० वाजेच्या सुमारास वतावरणात अचानक बदल होवून वादळी वारा सुटला होता. अचाकनपणे आलेल्या वाऱ्यामुळे झाडांच्या फांद्या उन्मळून पडल्या होत्या. तर, दुचाकी वाहन चालकांनी आपल्या गाड्या रस्त्याच्या कडेला लावून आडोशाला उभे राहिल्याचे दिसून आले. तर, संपूर्ण वातवरणात धुळीचे साम्राज्य पसरल्याचे दिसून आले. त्यामुळे याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होणार असल्याचे देखील बोलले जात आहे.

**तीन दुचाकी पडले झाड**

नौपाडा परिसरात गांधर्वी इमारतीच्या आवारात पार्क केलेल्या ३ दुचाकी गाड्यांवर झाड पडले. ते पडलेले झाड कापून बाजूला करण्यात आले असून त्या गाड्यांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नाही.

**स्ट्रीट लाईट पोल**

जुन्या कळवा खाडी पुलावरील स्ट्रीट लाईट पोल मधोमध तुटून फुटपाथ वरती पडला आहे. ही सव्वा चार वाजण्याच्या सुमारास समोर आली. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नाही. पडलेला पोल ठामपा विद्युत विभागाच्या कर्मचाऱ्यांनी बाजूला केला.

**धोकादायक फलक हटवला**

ठाणे स्टेशनकडे जाणाऱ्या रोडवरती असलेला दिशादर्शक फलक वाऱ्यामुळे धोकादायक झाला होता. तो फलक ठामपा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने काढून बाजूला करण्यात आला आहे.

## घरावर कोसळले झाड ; पत्रे फुटून नुकसान

ठाणे: दिवा,डी आर नगर येथे अविनाश चाळीमधील एका घरावर शनिवारी सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास झाड पडले.सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसली तरी घराचे पत्रे फुटून नुकसान झाले आहे. पडलेले झाड कापून बाजूला करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

## ओवळा परिसरात गाडीवर पडले झाड

ठाणे: घोडबंदर रोडवरील ओवळा सिग्नल जवळ रस्त्याशेजारी पार केलेल्या चारचाकी गाडीवर झाड पडले. ही घटना शनिवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास समोर आली. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसून गाडीच्या पुढील भागाचे नुकसान झाले आहे. तसेच ते पडलेले झाड कापून बाजूला करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

# टेरेसवरील घराच्या भिंतीला तडे

## तातडीने केले घर रिकामे

**ठाणे:** मुंब्रा,ठाकूर पाडा येथील तळ अधिक सात मजली प्रवीण पॅलेस या इमारतीच्या टेरेसवर बांधलेल्या घराच्या भिंतींना अचानक शुक्रवारी तडे गेल्याची बाब समोर आली. भिंती तडे गेल्याने उर्वरित भिंत व घर धोकादायक झाल्याने तातडीने ते रिकामे करण्यात आले. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नाही. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

मुंब्र्यात शुक्रवारी दुपारी साडे चार वाजण्याच्या सुमारास प्रवीण पॅलेस या इमारतीच्या टेरेसवर बांधलेल्या घराच्या भिंतींना तडे गेले. अशी मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली.

तसेच सुरक्षेच्या कारणास्तव अग्निशमन दलाच्या जवानांनी इमारतीच्या टेरेसवरील घर रिकामी केले आहे. त्याबाबत मुंब्रा प्रभाग समिती बांधकाम आणि अतिक्रमण विभागाला माहिती देण्यात आली असून पुढील कार्यवाही त्या विभागामार्फत सुरू असल्याचे आपत्ती व्यवस्थापन विभागाने सांगितले.

# ठाण्यात मनसेचा टपाल विभागाला दणका

**ठाणे :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यात मनसैनिकांना महाराष्ट्रातील बँकेतील व्यवहार तसेच महाराष्ट्रातील आस्थापना यांना मराठीचा वापर प्रामुख्याने केले पाहिजे असे सांगितल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने ठाण्यात टपाल विभागाला दणका देण्यात आला टपाल विभाग भारत सरकारच्या अंतर्गत येणारा विभाग असून महाराष्ट्र शासनाने काढलेल्या शासन आदेशाचा अनुषंगाने महाराष्ट्रात असलेल्या शासकीय, निमशासकीय व इतर शासन संचालित अस्थापनांना आपल्या दैनंदिन कामकाजात मराठीचा वापर प्रामुख्याने करणे अनिवार्य केले आहे तसेच या आदेशाचे पालन न करण्यार्‍या सरकारी अधिकार्‍यांवर कारवाई करण्याचे अधिकार संबंधित आस्थापनांचे प्रमुख तसेच शासनाची मराठी भाषा समिती यांना दिली आहे पण असे असून सुद्धा या आदेशाची पायमल्ली ठाण्यातील टपाल विभाग राजरोजपणे करत असल्याकारणाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्वप्नील महिंद्रकर यांनी ठाण्यातील पोखरण रोड येथील टपाल कार्यालयात धडक देऊन तेथील विभागीय प्रमुख यांना शासनाने दिलेल्या आदेशाची आठवण करून दिली तसेच स्वत:च्याच राज्यात पाहुणे बनू नका महाराष्ट्रात मराठीचा वापर करा असा संदेश असलेली प्रतिमा भेट देण्यात आली व येत्या पंधरा दिवसात सदर टपाल विभागातील व्यवहार मराठी भाषेत झाला नाही तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असे नमूद केले सदर आंदोलन दिनकर फुलसुंदर, दत्ता चव्हाण, मनीष सावंत ,प्रकाश महाले ,किशोर पाटील ,संतोष कांबळे, संदीप कडू, कृष्णा देवकोटा आदी उपस्थित होते.

*डाकघर मधील बहुतेक कर्मचारी परप्रांती असून सदर कर्मचारी जाणून बुजून मराठी लोकांना मराठी फॉर्म व साहित्य नसल्याचे वारंवार सांगत आहेत.*

ठाणे शहरातील केंद्रशासन संचालित विविध आस्थापना यांच्या मध्ये मराठीचा वापर प्रामुख्याने करावा व तसे न झाल्यास मनसेच्या वतीने सदर आस्थापनांना धडा शिकवण्यात येईल. - स्वप्नील महिंद्रकर ,ठाणे शहर अध्यक्ष जनहित व विधी विभाग मनसे

## स्वत:च्याच राज्यात पाहुणे बनू नका, महाराष्ट्रात मराठीचा वापर करा...असा संदेश असलेली प्रतिमा दिली भेट

## मराठीचा वापर करण्यासंदर्भात शासनाने दिलेल्या आदेशांची करून दिली आठवण



# दिवा आणि मुंब्रा परिसरात कारवाई ; ८२ अनधिकृत नळ जोडण्या खंडीत, २ गुन्हे दाखल



**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेने दिवा आणि मुंब्रा परिसरात चौथ्या दिवशी केलेल्या कारवाईत ८२ अनधिकृत नळ जोडण्या खंडीत केल्या. तर, या प्रकरणी २ गुन्हे दाखल झाले आहेत. आतापर्यंत एकूण ४ प्रकरणात गुन्हे दाखल झाले आहेत. यापूर्वी, तिसर्‍या दिवशी ५७ अनधिकृत नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या होत्या. तर, पहिल्या दिवशी २९ नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या होत्या. दुसर्‍या दिवशी ४४ नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत.

कल्याण फाटा ते वाय जंक्शन येथे ०३ व्यावसायिक तर, २१ घरगुती अनधिकृत नळ जोडण्या खंडीत करण्यात आल्या. तसेच, ०५मोटर व पंप जप्त आणि एक अनधिकृत टँकर भरणा केंद्र बंद करण्यात आले. त्याचबरोबर, वाय जंक्शन ते मुंब्रा येथे ३५ निवासी अनधिकृत नळ संयोजन खंडीत करण्यात आले. दिवा चौक, महोत्सव मैदानजवळही २३ निवासी अनधिकृत नळ संयोजन खंडीत करण्यात आल्याची माहिती उपनगर अभियंता यांनी दिली.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अनधिकृत नळ जोडण्यांविरोधात कडक कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे आणि नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांच्या मार्गदर्शनाखाली गेले चार दिवस मुंब्रा-दिवा प्रभाग समितीचा अतिक्रमण विभाग आणि पाणी पुरवठा विभाग यांनी संयुक्तपणे ही कारवाई करण्यात आली.



# फिर्यादीला ठोठावला न्यायालयाने दंड ; पोलीस आणि न्यायालयाचा वेळ वाया घालविणे पडले महागात

**ठाणे:** काशीमीरा पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या खंडणी आणि मारहाणीच्या गुन्ह्यात फिर्यादी यांना ठाणे सत्र न्यायालयाने २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. हा दंड पोलीस यंत्रणा आणि न्यायालयाचा वेळ वाया घालवल्याप्रकरणी शुक्रवारी ( ४ एप्रिल २०२५ ) ठोठावला, अशी माहिती सरकारी वकील संजय मोरे यांनी दिली.

फिर्यादी देवकुमार शेट्टी हे मीरारोड, महाजनवाडी येथील ए बॉसी बारचे मॅनेजर आहेत. १३ मार्च २०२५ रोजी आरोपी उजाला चौधरी यांनी शेट्टी यांना ते दीपक पांडे याचा माणूस असल्याचे सांगितले. तसेच बार चालू ठेवायचा असेल तर दरमहा २५ हजार हप्ता दयावा लागेल असे सांगितले. त्याला शेट्टी यांनी नकार दिल्यावर चौधरी यांनी मारहाण करून चाकूचा धाक दाखवला. तसेच बार चालू ठेवायचा असेल तर २५ हजार रुपये खंडणी द्यावी लागेल आणि न दिल्यास जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी काशीमीरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर चौधरी याने ठाणे सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज केला होता. त्या अर्जाची सुनावणी न्यायाधीश अमित शेटे यांच्यासमोर आल्यावर शेट्टी यांनी चौधरी यांना जामीन देण्यास काही हरकत नाही. असे प्रतिज्ञापत्र सादर केले. त्याला सरकारी वकील संजय मोरे यांनी तीव्र आक्षेप नोंदवला. तो आक्षेप ग्राह्य मानून न्यायालयाने चौधरी याला जामीन मंजूर करताना, पोलीस यंत्रणा आणि न्यायालयाचा वेळ वाया घालवला म्हणून शेट्टी यांना २५ हजार रुपये दंड ठोठावला. तसेच दंडाची रक्कम एक आठवड्यात सरकारी दप्तरी जमा करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. अशी माहिती सरकारी वकील मोरे यांनी दिली.

# गर्भवती मातांनी रोज आपल्या बाळाशी संवाद साधावा - जीवनदानी साधक सुहास गुधाटे

## ठाणे महापालिका व मनशक्ती केंद्र आयोजित

### गर्भाचे भावविश्व अर्थात वैज्ञानिक गर्भसंस्कार व्याख्यानास उत्स्फूर्त प्रतिसाद

**ठाणे** : नवीन पिढी सक्षम करण्यासाठी पालकत्वही तितकेच सक्षम असणे आवश्यक असते, आहे, गरोदरमातांनी केलेल्या विचारांचा परिणाम हा बाळावर होत असतो. यासाठी गर्भवती मातांनी रोज आपल्या बाळाशी संवाद साधावा, आपल्या बाळाला समजत आहे या भावनेने त्याच्याशी बोलत रहावे याचे कळत नकळत परिणाम हे गर्भातील बाळावर होत असल्याचे मनशक्ती केंद्र, लोणावळा येथील जीवनदानी साधक सुहास गुधाटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना नमूद केले.

ठाणे महानगरपालिका आयोजित मनशक्ती प्रयोग केंद्र, लोणावळा प्रस्तुत 'गर्भाचे भावविश्व अर्थात वैज्ञानिक गर्भसंस्कार' या विषयावरील मार्गदर्शन कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आज आयोजित करण्यात आले होते. यावेळी उपवैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिताली वाघमारे, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. वर्षा ससाणे, मनशक्ती प्रयोग केंद्राचे साधक मनोज पाटील, सुधाकर पाठक, जयप्रकाश वराडकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमास ठाणे महापालिकेतील विविध आरोग्य केंद्रात तपासणीसाठी येण्यऱ्या गरोदर मातांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

गर्भाचे भावविश्व अर्थात वैज्ञानिक गर्भसंस्कार याविषयी मार्गदर्शन करताना वक्ते सुहास गुधाटे यांनी वैज्ञानिक गर्भसंस्कारामध्ये गर्भावस्थेदरम्यान आई आणि तिच्या बाळाच्या शारिरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यासाठी वैज्ञानिकदृष्ट्या आधारित मार्गदर्शन आणि उपायांचा समावेश असतो, या उपायांमुळे बाळाचा उत्तम विकास आणि आईचे आरोग्य सुधारण्यास मदत होत असल्याचे नमूद केले. आईमध्ये असलेल्या गुणांचा बाळामधील गुणांमध्ये गुणाकार होवून गुण कसे वाढतील आणि दोष कसे कमी यासाठी गरोदर मातांनी प्रयत्न करावेत. गर्भधारणा ही निसर्गाने दिलेली गोष्ट आहे, त्यामुळे त्याबद्दल मनात कुठलेही भय ठेवू नये. प्रसुती नैसर्गिक होण्यासाठी गरोदर मातांनी नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे.

तसेच नैसर्गिक प्रसुती होईल अशी भावना मनात ठेवावी यासाठी हलकी आसने करावीत. गर्भातील बाळ हे अनेक गोष्टींना प्रतिसाद देत असते, यासाठी गर्भवती मातांनी चांगले संगीत ऐकावे, त्याचा थेट परिणाम हा बाळावर होत असतो. संगीतामुळे बाळाच्या उजव्या मेंदूला चालना मिळते, दोन्ही मेंदूचा समतोल राखल जातो. तसेच संगीत ऐकल्याने आईच्या मनावरचा ताण, चिंता आणि नैराश्य देखील कमी होण्यास मदत होते.

गर्भवती मातांच्या घरातील वातावरण देखील चांगले असणे गरजेचे आहे. भय, राग, धैर्य, शांती हे स्वभावाचे प्रकार आहेत. भय आणि राग हे अंगभूत असतात त्यावर नियंत्रण ठेवावे असेही सुहास गुधाटे यांनी मार्गदर्शन करताना नमूद केले. या कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी, आशा वर्कर्स, प्रसाविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## क्रेडाई एमसीएचआयच्या व्यवस्थापकीय समिती मध्ये झोपडपट्टी विकास समिती अध्यक्षपदी भूषण भानुशाली यांची नियुक्ती

**ठाणे** : एमसीएचआय क्रेडाईच्या नवीन व्यवस्थापकीय समितीमध्ये ठाण्यातील भूषण भानुशाली यांची व्यवस्थापकीय समिती सदस्य आणि झोपडपट्टी विकास समिती च्या अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ठाण्याच्या रियल इस्टेट व्यवसायात सकारात्मक काम करणाऱ्यांमध्ये भूषण भानुशाली यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या अनुभवाचा उपयोग आणि काम करण्याचे कौशल्य याचा निश्चितच फायदा रिअल इस्टेट व्यवसायाला होईल असा विश्वास एमसीएचआय क्रेडाईने व्यक्त केला आहे. सामूहिक कौशल्य, आवड आणि समर्पण हेच रिअल इस्टेट व्यवसायात महत्वाचे असून हे सर्व गुण भूषण भानुशाली यांच्यात असून त्यांनी ठाण्याच्या रियल इस्टेट क्षेत्रात वाढ, नाविन्य आणि प्रगती करावी अशा शुभेच्छा त्यांना एमसीएचआय क्रेडाईने दिल्या आहेत.

SHWAAS
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital
२५,००० ते २,००,००० पर्यंत विमा योजना

मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund
फुफ्फुस प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
अपघात शस्त्रक्रिया
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
अपघात
हृदयरोग
डायलिसिस
हाताचे प्रत्यारोपण
गुडघ्यांचे प्रत्यारोपण
विद्युत अपघात रुग्ण
नवजात शिशुंचे आजार
बर्न रुग्ण
मेंदूचे आजार
कर्करोग शस्त्रक्रिया
Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301
Emergency
7777008464
9076229076

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मानले यवतमाळवासीयांचे आभार,यवतमाळमध्ये आभार सभेचे आयोजन

**यवतमाळ :** यवतमाळमधील शेतक्रयांसाठी माहायुती सरकारने १००० कोटी आणि पोहरादेवी देवस्थान विकासासाठी ७५० कोटींचा निधी दिली. हे सर्वसामान्यांचे सरकार आहे म्हणूनच लोकांनी महायुतीला ऐतिहासिक विजय मिळवून दिला अशा शब्दांत शिवसेनेचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यवतमाळवासीयांचे आभार मानले. यवतमाळ येथे आयोजित आभार यात्रेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मंत्री उदय सामंत आणि मंत्री संजय राठोड यांच्यासह शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, यवतमाळवासीयांच्या आशीर्वादाने संजय राठोड यांनी २०२४ ला विजयाचा चौकार लगावला. आता ते मंत्री आणि पालकमंत्री आहेत. लोकांमध्ये जा, लोकांशी बोला, संवाद साधा निर्णय घ्या, असे निर्देश शिवसेनेच्या सर्व मंत्र्यांना दिले आहेत. शासन आपल्या दारी या उपक्रमातून पाच कोटी नागरिकांना फायदा झाला. एकाच छताखाली अनेक योजनांचे लाभ लोकांना त्यांच्या दारात जाऊन दिले, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाच्या विरोधात भूमिका घेऊन उबाठाने बाळसाहेबांच्या हिंदुत्वाला कलंक लावण्याचे काम केले. २०१९ ला स्वतःच्या स्वार्थासाठी आणि खुर्चीसाठी बाळासाहेबांच्या विचारांशी गद्दारी केली होती, आता वक्फ बोर्ड विधेयकाला विरोध करुन दुप्पट गद्दारी केली, अशी खरमरीत टीका शिंदे यांनी उबाठावर केली.

ते पुढे म्हणाले की, हे सरकार सर्वसामान्यांचे आहे. नो रिझन ऑन दि स्पॉट डिसीजन अशा प्रकारे काम करणारे सरकार आहे. ज्यांनी प्रत्येक कामात रिझन दिले त्यांचा सिझन निवडणुकीत जनतेने संपवला, अहंकारात बुडालेले आता तरी सुधारा, असा टोला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लगावला. कोण गद्दार कोण खुद्दारा याचा हिशेब जनतेने केला. ते पुढे म्हणाले, हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. इथ जो काम करेल तो पुढे जाईल, काहीजण कार्यकर्त्यांना कसपटासमान समजायचे. मात्र या महाराष्ट्रात सर्वसामान्यांचा सरकार आणण्याचे काम केले, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.



# मोक्याच्या जागेवरील जुन्या इमारती ठाण्यातील विशिष्ट बिल्डरांच्या घशात!

## भाजपचे नारायण पवार यांचा आरोप

**ठाणे:** ठाणे शहरातील पाचपाखाडीसह विविध भागातील मोक्याच्या जागेवरील जुन्या इमारती अतिधोकादायक ठरवून काही विशिष्ट बिल्डरांच्या घशात घातल्या जात आहेत. सुस्थितीतील इमारतींना अतिधोकादायक ठरविणारे काही स्ट्रक्चरल ऑडिटर व महापालिका काही अधिक्रयांच्या संगनमताने हा प्रकार सुरू आहे, असा आरोप भाजपाचे माजी गटनेते नारायण पवार यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांना पाठविलेल्या पत्रात केला आहे. तसेच या प्रकरणी चौकशीची मागणी केली आहे.

महापालिकेने स्ट्रक्चरल ऑडिटरची यादी करून ठाण्यातील रहिवाशांना यादीतील ऑडिटरकडून इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आवाहन केले होते. राज्य सरकारच्या नियमानुसार, अतिधोकादायक इमारतींसाठी सी-१, इमारत रिकामी करून दुरुस्ती करण्यासाठी सी-२ ए, इमारतीत राहून दुरुस्ती करण्यासाठी सी-२ बी, किरकोळ दुरुस्तीसाठी सी-३ अशी वर्गवारी करण्यात आली होती. परंतु, महापालिकेच्या निर्णयाचा सर्रासपणे गैरफायदा घेण्याचे काम काही विशिष्ट स्ट्रक्चरल ऑडिटर फर्म व काही महापालिका अधिक्रयांनी एकत्र येऊन केले. त्यानुसार शहरातील मोक्याच्या जागांवरील सुस्थितीतील इमारती बिनदिक्कतपणे धोकादायक ठरविल्या जात आहेत. सी-३, सी-२ बी, सी-२ ए श्रेणीतील इमारती सी-१ या अतिधोकादायक वर्गात टाकण्यासाठी काही बिल्डर व महापालिकेतील काही अधिकारी कार्यरत आहेत. धोकादायक इमारतींबाबतचा प्रस्ताव महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविला जातो. तर सार्वजनिक बांधकाम विभागातील इंजिनिअरकडून प्रत्यक्ष इमारतीची पाहणी न करताच, त्या सी-१ या अतिधोकादायक वर्गात टाकल्या जात आहेत. त्यानंतर वाढीव 'एफएसआय'चा फायदा घेऊन स्थानिक रहिवाशी व दुकानदारांवर दबाव निर्माण करून इमारती रिकाम्या करून बिल्डरांच्या स्वाधीन केल्या जात आहेत. असा आरोप माजी गटनेते नारायण पवार यांनी केला आहे.

शहरात बिल्डरांची सुपारी घेऊन काही स्ट्रक्चरल ऑडिटरच्या टोळ्या निर्माण झाल्या आहेत. या परिस्थितीत सर्वसामान्य रहिवाशी हवालदिल होऊन बिल्डरांच्या वरवंट्याखाली येऊन बेघर होत आहेत. अन्, हक्काच्या घरातून बाहेर फेकले जात आहेत. गेल्या दोन-तीन वर्षात पाचपाखाडी भागातील अनेक इमारती अशाच पद्धतीने अतिधोकादायक ठरवून पाडल्या गेल्या. सद्यस्थितीत पाचपाखाडीतील एका इमारतीभोवती स्ट्रक्चरल ऑडिटरने जाळे टाकले असून, ती अतिधोकादायक ठरविली आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेऊन, गेल्या पाच वर्षात स्ट्रक्चरल ऑडिटरने अतिधोकादायक म्हणून जाहीर केलेल्या इमारतींची छाननी करावी. तसेच यापुढील काळात स्ट्रक्चरल ऑडिटरकडून दाखल होणाऱ्या प्रस्तावांची त्रयस्थ संस्थांकडून चौकशी करून कार्यवाही करावी, अशी मागणी नारायण पवार यांनी पत्राद्वारे केली आहे.

**झोपडीचेही झाले होते ऑडिट!**

काही महिन्यांपूर्वी महापालिकेचे निवृत्त सहायक आयुक्त व बिल्डरच्या संगनमताने गणेशवाडीतील एका ३५ ते ४० वर्षांपूर्वीच्या झोपडीवजा घराचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा पराक्रम करण्यात आला होता. या झोपडीचे ऑडिट संशयास्पद होते. त्यानंतर ही झोपडी तोडून त्या कुटुंबाला बेघर करण्यात आले. त्यानंतर तेथे इमारतीचे काम सुरू करण्यात आले. नव्या इमारतीत झोपडीवासियाला घरही दिलेले नाही, असा गंभीर घडला असल्याचे नारायण पवार यांनी पत्रात नमूद केले आहे.